# प्रेसनोट

## <u>वाहन चोरी करणारे अटकेत</u>

## <u>११ मोटार सायकली व १ रिक्षा,मोबाईल,लॅपटॉप असा कि.रु ३,९७,०००/- चा मुद्देमाल जप्त</u>

दि.१८/०९/२०१७ रोजी भारती विद्यापिठ पोलीस ठाणे हददीत वाहन चोरीच्या व घरफोडी गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी पेट्रोलींग करीत असताना पोलीस कर्मचारी बाबा नरळे व समीर बागसिराज यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील वाहन चोरी करणारा गुन्हेगार गणेश पारखे हा हॉटेल रॅविश कोर्ट कात्रज जुना बोगदा येथे संशयीत रित्या एका काळे रंगाचे पल्सर मोटार सायकलवर थांबलेला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरचे बातमीवरुन भारती विदयापीठ पोलीस ठाणे तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड व स्टाफच्या टिम तयार करुन हॉटेल रॅविश कोर्ट कात्रज समोर जावुन अचानकपणे १५/३० वा.छापा घालून स्टाफचे मदतीने जागीच पकडुन त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचा नाव पत्ता गणेश ऊर्फ राधे मारुती पारखे वय. २३ वर्ष रा. वाघजाईनगर सच्चाईमाता मंदीरामागे आंबेगाव खुर्द पुणे व एक अल्पवयीन बालक यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे मिळालेल्या पल्सर मोटार सायकल बाबत चौकशी केली असता व त्यास गाडी चालविणेचा परवाना व गाडीच्या मुळ कागदपत्रांची मागणी केली असता असमाधानकारक उत्तरे देवु लागल्याने त्यांनी सदरची पल्सर मोटार सायकल ही कोठुन तरी चोरुन आणल्याचा संशय वाटु लागल्याने त्यांना पोलीस ठाणेस आणून अधिक तपास करता त्याने आणखी मोटार सायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने गणेश पारखे यांस अटक करुन व अल्पवयीन बालकास ताब्यात घेवुन तपासादरम्यान त्यांचेकडुन एकूण ८ मोटार सायकली व १ ऑटो रिक्षा अशी एकूण ९ वाहने कि.रु ३,१०,०००/- च्या असा चोरीचा माल हस्तगत केलेला आहे.

तसेच दुस-या कारवाईत पोलीस कर्मचारी गणेश चिंचकर व उज्वल मोकाशी यांना मिळालेल्या बातमीवरून आरोपी नामे-१)मनेष दत्तू पवार वय-२५ वर्ष रा.कुमालवाडी ता.जि.उस्मानाबाद २)अमरजित ललन सिंग वय-२२ वर्षरा.गंगाधाम मार्केटयार्ड पुणे व एक अल्पवयीन बालकास ताब्यात घेवून त्यांचेकडून ३ मोटार सायकल व एक लॅपटॉप,मोबाईल असा कि.रू-८७,०००/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

वरील आरोपीकडून भारती विद्यापिठ पोलिस स्टेशन,कोंढवा पोलिस स्टेशन,फरासखाना पोलिस स्टेशन मार्केटयार्ड पोलिस ठाणेकडील गुन्हे उघडकीस आले आहेत.अधिक तपास **तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.**

**ही कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण विभाग, मा. डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री कमलाकर ताकवले सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड, पो.उप-निरीक्षक दत्तात्रय मोहीते, पो.कर्मचारी गणेश सुतार, समीर बागसिराज, बाबासाहेब नरळे, ,गणेश चिंचकर,उज्वल मोकाशी, अभिजीत रत्नपारखी यांचे पथकाने केलेली आहे.**

भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक – २०/०९/२०१७

- प्रेसनोट –

दहशद निर्माण करण्यासाठी रिव्हॉल्व्हर बाळगणारा आरोपी अटकेत

---

दिंनाक – २०/०९/२०१७ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले सो‌ा यांच्या आदेशाने भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते व तपास पथकातील कर्मचारी हे बैल पोळयाच्या अनुषंगाने बंदोबस्तास करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी अमोल पवार व कुंदन शिंदे यांना मिळालेल्या बातमी वरुन शनिनगर चौक पुणे येथे सापळा रचुन अशरफ खलील शेख, वय २४ वर्षे, रा. सिहंगड रोड, पुणे यास पकडण्यात आले आहे त्याचे ताब्यातुन विनापरवाना एक देशी बनावटीचे रिव्हॉल्व्हर किंमत रुपये २५,०००/-- व २ जिवंत काडतुस त्याची किंमत रुपये २००/- असे एकुण कि. रु.२५,२००/- चा माल जप्त करण्यात आलेले आहे .

सदरबाबत भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे गु.र.न. –४६५/२०१७ भारतीय हत्याराबाबत चा कायदा कलम ३(२५) सह मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त श्री रविंद्र सेनगावकर सो‌ा परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंढे सो‌ा, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो‌ा यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले, तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते, कर्मचारी अमोल पवार, प्रणव संकपाळ, सरफराज देशमुख, कुदंन शिंदे, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, यांनी केलेली आहे